Literacy for a Billion

Movie: Tuch Khari Gharchi Laxmi
Year: 2011

Song: Mahapurachya Laatevarti
Lyricist:

महापूराच्या लाटेवरती
महापूराच्या लाटेवरती
होई वर खाली
नौका दिशाहीन झाली
नौका दिशाहीन झाली
आभाळ फाटे कापे धरणी
सोडी घरटे मुकी पक्षिणी
माणुसकीला कलंक लागे
माणुसकीला कलंक लागे
दैव घाव घाली
नौका दिशाहीन झाली
नौका दिशाहीन झाली

फोडीत टाहो सुकल्या ओठी
अंकुर जपते आपुल्या पोटी
अंधारी या वाट शोधीते
अंधारी या वाट शोधीते
अवती भवताली
नौका दिशाहीन झाली
नौका दिशाहीन झाली

दाव उद्याची पहाट देवा
अश्रापाला देई विसावा
श्री गुरूदेवा तुझ्यावाचूनी
श्री गुरूदेवा तुझ्यावाचूनी
कोण असे वाली
नौका दिशाहीन झाली
नौका दिशाहीन झाली
नौका दिशाहीन झाली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*